# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** प्रभाग क्र. 8 अंतर्गत मोमीनपुरा स्थित बकरामंडीची इमारत शिकस्त व
**{लोककर्म झोन क्र. 6}** जीर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने बकरामंडीची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याकरिता सादर.

टिप:- 1) मोमीनपुरा स्थित बकरामंडीची इमारत शिकस्त व जीर्ण झालेले असुन सार्वजनिक सुरक्षिततेच्या व संभाव्य धोका टाळण्याच्या दृष्टीने ते तोडण्यात यावे याकरिता मा नगरसेविका, श्रीमती आशा नेहरु उईके (आयेशा) यांनी उपायुक्त मालमत्ता, महानगरपालिका नागपूर यांना निर्देश दिलेले आहे.
2) सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट नस्तीत संलग्न आहे.
3) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- ०९/मनपा/प्रशासक** **दिनांक :- १८/०५/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१(भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (झोन क्र. ६), लोककर्म विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार प्रभाग क्र. 8 अंतर्गत मोमीनपुरा स्थित बकरामंडीची इमारत शिकस्त व जीर्ण असल्यामुळे जिवितहानी व वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने बकरामंडीची इमारत तोडण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**